# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 14 May 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १४ मे २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- दहशतवादाचा बिमोड करण्यात सैन्यदलांनी दाखवलेल्या शौर्याचं राष्ट्रपतींकडून कौतुक
- स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीनं देण्यात येणारे पुरस्कार जाहीर
- छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमातून अभिवादन
- अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे करण्याची काँग्रेसची मागणी

आणि

- खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचा उद्या समारोप–१२९ पदकांसह महाराष्ट्र अव्वल

****

दहशतवादाचा बिमोड करण्यात सैन्यदलांनी दाखवलेल्या शौर्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कौतुक केलं आहे. तिन्ही संरक्षण दलांचे मुख्य अधिकारी सीडीएस जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, हवाईदल प्रमुख एअरचीफ मार्शल ए.पी. सिंग आणि नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी आज देशाच्या तिन्ही संरक्षण दलांच्या प्रमुख असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती दिली. त्यावेळी राष्ट्रपतींनी आपल्या संरक्षण दलाच्या समर्पण आणि शौर्याचं कौतुक केलं.

दरम्यान, ऑपरेशन सिंदूरचं देशोदेशीच्या संरक्षण विषयक तज्ज्ञांनी कौतुक केलं आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने अजिबात वेळ न दवडता सूडभावनेने नव्हे तर जरब बसवण्यासाठी ही कामगिरी केली, असं अमेरिकेचे निवृत्त लष्करी अधिकारी डॉन स्पेन्सर यांनी म्हटलं आहे. ऑस्ट्रियातले तज्ज्ञ लेखक टॉम कूपर यांनी या नेमक्या हालचालींबद्दल तसंच हवाई दल आणि लष्कराच्या योग्य वापराबद्दल या

कारवाईची प्रशंसा केली आहे. दहशतवादाविरोधात लढताना अण्वस्त्रांच्या धमकीसमोर न झुकण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका प्रशंसनीय असल्याचा उल्लेख दोन्ही तज्ज्ञांनी केला आहे.

****

ऑपरेशन सिंदूरनं संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे. या मोहिमेच्या यशामागे आकाशतीर ही हवाई संरक्षण प्रणाली असून या प्रणालीनं पाकिस्तानी ड्रोन, क्षेपणास्त्रं तसंच अन्य शस्त्रांस्त्रांना रोखण्यात आणि निष्क्रीय करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

****

ऑपरेशन सिंदूर बद्दल सर्वसामान्य नागरिकांकडून समाधान व्यक्त केलं जात आहे. १९७१ च्या भारत पाक युद्धात देशाच्या पश्चिमी सीमेवर तोफखाना सांभाळलेले आणि सध्या छत्रपती संभाजीनगर इथं वास्तव्यास असलेले निवृत्त कॅप्टन सुरेंद्र सुर्वे यांनी ऑपरेशन सिंदूरबद्दल बोलतांना, पाकिस्तानला धडा शिकवणं गरजेचं होतं, असं मत व्यक्त केलं. ते म्हणाले –

**बाईट – निवृत्त कॅप्टन सुरेंद्र सुर्वे**

****

भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी आज शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.
नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झालेल्या या सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

केंद्र सरकारने उत्तरप्रदेशात गौतम बुद्ध नगर जिल्ह्यात सेमी कंडक्टर प्रकल्प उभारण्यास मंजुरी दिली आहे. आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे देशाला मोठं बळ मिळाल्याकडे वैष्णव यांनी लक्ष वेधलं, ते म्हणाले –

**बाईट – अश्विनी वैष्णव, माहिती आणि प्रसारण मंत्री**

****

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीनं देण्यात येणारे पुरस्कार आज जाहीर करण्यात आले. 'स्वातंत्र्यवीर सावरकर शौर्य' पुरस्कार यंदा मराठा लाइट इन्फंट्रीचे मेजर अनिल अर्स यांना जाहीर झाला आहे. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि १ लाख एक हजार एक रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. तर, 'स्वातंत्र्यवीर सावरकर विज्ञान पुरस्कार' आयआयटी मुंबईचे शास्त्रज्ञ मिलिंद अत्रे यांना जाहीर झाला आहे. मानपत्र, स्मृतिचिन्ह, आणि ५१ हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

महाविद्यालयीन युवकांनी 'MY भारत' पोर्टलवर सिव्हिल डिफेन्स वॉरिअर म्हणून नोंदणी करण्याचं आवाहन उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलं आहे. केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या अध्यक्षतेखाली सर्व राज्यातल्या राष्ट्रीय सेवा योजना पदाधिकाऱ्यांसोबतची ऑनलाइन बैठक आज झाली, त्यावेळी ते बोलत होते.

****

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केलं आहे.

नांदेड इथं अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजीनगर इथं मिरवणुका तसंच इतर कार्यक्रमातून संभाजी महाराजांना अभिवादन करण्यात आलं. विलासबापू भुमरे प्रतिष्ठानच्या वतीने क्रांती चौक परिसरात साडे चार क्विंटल गव्हाचा वापर करून छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिमा साकारण्यात आली.

****

अवकाळी पावसानं शेतीच्या झालेल्या नुकसानाचे सरकारनं तातडीनं पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. १ रुपयात पीक विमा योजना ही पुन्हा लागू करावी, बोगस बियाणे विकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्याही त्यांनी केल्या. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या बलिदान दिनी, २१

मे ला राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये तिरंगा यात्रा काढणार असल्याची माहिती सपकाळ यांनी यावेळी दिली.

****

बीड जिल्ह्यात पाच ते १३ मे या कालावधीत अवकाळी पावसामुळे सुमारे १८ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं तर तिघांचा वीज पडून मृत्यू झाल्याची प्राथमिक नोंद महसूल विभागाच्या वतीने करण्यात आली आली आहे.

****

लातूर तालुका काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळानंही तातडीनं नुकसानाचे पंचनामे करण्याची मागणी केली आहे. या मागणीचं निवेदन आज लातूरच्या तहसीलदारांकडे देण्यात आलं.

****

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचा उद्या समारोप होत आहे. या स्पर्धेत १२९ पदकांची कमाई करत महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. यात ४९ सुवर्ण, ४१ रजत आणि ३९ कांस्यपदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत हरियाणा ७५ तर राजस्थान ४६ पदकांसह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

****

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षानं देशभर तिरंगा यात्रेचं आयोजन केलं आहे. येत्या २३ मे पर्यंत तिरंगा यात्रा देशभर सुरू राहणार आहे. दक्षिण मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज मुंबई भाजपातर्फे तिरंगा यात्रा काढण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यात परळी इथं उद्या भव्य तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. या रॅलीत सर्व नागरिकांनी उत्साहाने सहभागी होण्याचं आवाहन भाजपा शहराध्यक्षा उमा समशेट्टे यांनी केलं आहे.

****

हवामान

राज्यात आज सर्वाधिक ४२ पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस तापमान ब्रह्मपुरी इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात परभणी इथं ३६, छत्रपती संभाजीनगर इथं ३६ पूर्णांक आठ, तर बीड इथं ३८ पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****

येत्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी फक्त डी ए पी अर्थात डाय अमोनियम फॉस्फेट या खतावर अवलंबून न राहता, एस एस पी अर्थात सिंगल सुपर फॉस्फेट, एनपीके श्रेणीतली खतं आणि टी एसपी अर्थात ट्रिपल सुपर फॉस्फेट या अन्य खतांचा वापरही करावा, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

****